# आष्टीत त्रिदल सैनिक सेवा संघ तिसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा




आष्टी । प्रतिनिधी

आष्टी सारख्या एका छोट्या शहरातून त्रिदल सेवा संघ या संघटनेचे छोटेसे रोपटे लावले सैनिकाच्या अडीअडचणी सोडवत संघटनेने काम केले आहे.या संघटना आणखी मजबूत करत त्याचा राज्यभरात वटवृक्ष करण्याचे काम या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अंकुश खोटे यांनी केले असल्याचे प्रतिपादन युवा नेते श्याम धस यांनी केले आहे.

ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते तर आमची संघटना वाढण्याकरता आम्हाला कुठेतरी एका मोठ्या राजकीय वरद हस्ताची म्हणजे पाठीराख्याची गरज होती ती आता कणखर नेतृत्व आ.सुरेश धस पूर्ण झाले आहे त्यामुळे येणाऱ्या काळाम ध्ये आमची संघटना मजबूत करून आम्ही दाखवून देऊ आम्ही पळणारे नाहीतर लढणारे आहोत संघटनेसाठी पुढच्या वर्धापनदिनापर्यंत महाराष्ट्रभर मोठे काम करु असे प्रतिपादन संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष मेजर अंकुश खोटे यांनी आपल्या संघटनेच्या तिसऱ्या वर्धापनदिनी सैनिकांना संबंधित करताना केले.

आष्टी येथे त्रिदल सैनिक सेवा संघ संघटनेचा तिसरा वर्धापन दिन रविवार दि.५ जानेवारी रोजी कृष्णा हॉटेल येथे प्रमुख मान्यवर व महाराष्ट्रातुन आजी माजी सैनिक यांच्या उपस्थितीत मोठ्या दिमाखदार सोहळ्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष युवा नेते श्याम धस होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य अध्यक्ष अंकुश खोटे,उपाध्यक्ष महादेव खेडकर, उपाध्यक्ष जमीर पठाण,उपाध्यक्ष संजीव फसले, आष्टी तालुकाध्यक्ष नवनाथ भगत, बीड जिल्हाध्यक्ष महादेव बांगर, संजय म्हस्के, सातारा जिल्हाध्यक्ष दत्ता माळी, पुणे जिल्हाध्यक्ष परशुराम शिंदे, करमाळा तालुकाध्यक्ष अरकुर शिंदे,श्रीगोंदा तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण, रावसाहेब शिंदे, प्रवीण कदम, मधुकर साळवे, रामराव तांबे, दत्ता शिंगारे, बबन पवार, अशोक जायभाय, शेख, हनुमंत सानप आदी उपस्थित होते. यावेळी ह.भ.प. गोविंद महाराज जगताप यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले,सैनिकांच्या अन्याय विरोधात लढा द्या, आमच्या समस्या सोडा,आपल्या तालुक्यात सर्व विभागाच्या कार्यालयात अनेक समस्या आहेत.अधिकारी हे सर्वसामान्यांच्या कामासाठी आढेवेढे घेतात.त्रिदल सेवा संघ या संघटनेचे नाव देशात गाजले पाहिजे. सैनिकाच्या अडीअडचणी सोडवण्याचे प्रामाणिकपणे ही संघटना काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.



*धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे खंडोबा यात्रा उत्सवात साजरी करण्यात आली यावेळी धारूर तालुका परिसरातील नागरिक भावी फक्त मोठ्या संख्येने हजर होते यावेळी गाड्या ओढण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात असतो दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खंडोबा यात्रेची आयोजन करण्यात आले होते रवीवारी दुपारी चार वाजता गाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न झाला मोठ्या प्रमाणात भावी भक्त आले होते.*

## माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा संस्थेच्या अंतर्गत प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन



तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे सांस्कृतिक कार्यक्रम ठेवण्यात आले आहे. यंदाचे हे तिसरे वर्ष असून रविवार दिनांक ५ जानेवारी ते १२ जानेवारी पर्यंत हा क्रिडामहोत्सव संस्थेच्या विविध शाळेमध्ये आयोजित करण्यात आले आहे.दि. ७ जानेवारीला तलवाडा येथे हॉलीबॉल स्पर्धा होणार आहेत. जयभवानी जगदंबा शिक्षण संस्थेतील १८०० विद्यार्थी खेळाडूंना किटचे मोफत वाटप करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा येथे जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक डॉ. आसाराम मराठे ,युवा कार्यकर्ते रवी मरकड यांच्या हस्ते खेळाडूंना किटचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य प्रमोद गोरकर, सह पर्यवेक्षक अरुण हाटकर उच्च म ाध्यमिक विभाग प्रमुख प्रा. भोसले सर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका बोबडे मॅडम, एन एस एस प्रमुख प्रा. पैठणे सर, सांस्कृतिक विभाग प्रमुख जाधव सर,लाड सर,येवले सर,सह प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते.



*राजेभाऊ फड यांनी घेतली नानाभाऊ पटोले यांची सांत्वन भेट - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या मातोश्रींचे काही दिवसांपूर्वी दुःखद निधन झाले. रविवारी त्यांच्या गावी जाऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी सांत्वनपर भेट घेतली. यावेळी सलील देशमुख सोबत होते.*

## ग्राहकांच्या विश्वासावर पुर्णवादी बँकेची यशस्वी वाटचाल

माजलगाव । प्रतिनिधी

पूर्णवादी बँकेच्या सर्व शाखेमध्ये माजलगाव शाखेचा अग्रगण्य क्रमांक असुन येथील ग्राहकांच्या विश्वासावरच पुर्णवादी बँकेची यशस्वी वाटचाल सुरू असुन येथील शाखेतुन ग्राहकांना तत्पर व दर्जेदार सुविधा मिळतील असा विश्वास पूर्णवादी बँकेचे चेअरमन डॉ. सुभाष जोशी यांनी व्यक्त केला.येथील पूर्णवादी बँकेच्या शाखेने ग्राहक मेळाव्याचे आयोजन आज ता. ४ शनिवारी करण्यात आले होते.

या मेळाव्यास डॉ. आर. जी. बजाज, जिवन जगताप, सुरेंद्र कलंत्री, शशिकिरण गडम, महेश पारगांवकर, शिवसेना तालुकाप्रम ुख तुकाराम येवले उपस्थित होते. यावेळी बोलतांना चेअरमन जोशी म्हणाले की, माजलगाव तालुका हा समृध्द व माणुसकी जपणारा तालुका म्हणुन सर्वपरिचीत आहे. येथे पतसंस्था, बँका यांची संख्या जवळपास दोनशेच्या अधिक असतांना देखील येथील पूर्णवादी शाखेतील ठेवी व ग्राहकांचे बचत खाते, करंट खाते व कर्जवाटप मोठ्या प्रमाणावर आहे तर सर्व शाखेंपैकी सर्वात मोठी शाखा म्हणुन माजलगाव शाखेची गणना केली जाते. बँकेकडे ९७ कोटी रूपयांच्या ठेवी असुन ११२ कोटी रूपयांच्या ठेवीचे उद्दीष्ट या शाखेसाठी ठेवण्यात आले असल्याचेही सांगीतले तर ग्राहकांच्या विश्वासावरच या बँकेची यशस्वी वाटचाल असुन वाढीव कर्मचारी देण्याबरोबरच गोल्ड लोनसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

## नियमित अभ्यासातून ध्येयपूर्तीचा आनंद बहुगुणित करावा : अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे

### ज्ञानराज विद्यालयात कु.प्रतीक्षा ठोंबरेचा गौरव संपन्न



बीड । प्रतिनिधी

उंदरी ता. केज( दि.४ जानेवारी २०२५) नियमित अभ्यास करून आपल्या ध्येयपूर्तीचा आनंद बहुगुणित करावा व आपल्याला सर्वांगीण विकास साधायचा असेल तर जन्म दात्री माता आणि अन्नधान्य पुरविणारी माती यांचे संवर्धन आणि जतन केल्यावरच आपला सर्वांगीण विकास साधला जाणे शक्य आहेअसे मत शासकीय कृषि महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे यांनी व्यक्त केले .ते आज उंदरी ता. केज या ठिकाणी झालेल्या सत्कार सोहळ्यात बोलत होते. उंदरी गावातील ज्ञानराज विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. प्रतीक्षा नंदकिशोर ठोंबरे हिने अत्यंत खडतर समजली जाणारी चार्टर्ड अकाउंटंटची परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे तिचा विद्यालयाच्या वतीने सन्मान करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री विठ्ठल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री ज्ञानेश्वरराव ठोंबरे तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री सुंदरराव आदमाने सर ,राष्ट्रपती पदक पुरस्कार प्राप्त माजी पोलीस निरीक्षक सय्यद रहेमान साहेब, उंदरीचे सरपंच सुदाम पाटील उपस्थित होते .यावेळी बोलताना डॉ. ठोंबरे म्हणाले की आजच्या स्पर्धे च्या युगात टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय पर्याय नाही कु. प्रतीक्षाहीने अत्यंत विपरीत परिस्थितीमध्ये सी ए होण्याचे स्वप्न पूर्ण केले त्याबद्दल तिचे कौतुक करत तिच्या आई-वडिलांचाही याप्रसंगी सन्मान करण्यात आला याप्रसंगी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक रेहमान साहेब यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले की या स्पर्धेच्या युगात मोबाईल वरील व्हाट्सअप पाहून कोणीही यश मिळू शकत नाही त्यासाठी वाचन संस्कृती टिकली पाहिजे. संस्थेचे सचिव आदमाने सर यांनी याप्रसंगी बहुम ोल असे मार्गदर्शन केले. याप्रसंगी कर्मवीर डॉ. बालासाहेब ठोंबरे पाटील प्रतिष्ठानच्या वतीने श्री.जनार्दन ठोंबरे पाटील आणि श्री रामराव ठोंबरे पाटील यांनी प्रतीक्षा चा सन्मान केला.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८/ २०२५**
**अ‍ॅड. एस. एस. उबाळे यांचे मार्फत**
**मारुती व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी, **नरसु बाबु झोडगे**, हे दिनांक **१६/११/२०१०** रोजी कानडीघाट, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी,

१. मारुती पि. नरसु झोडगे, वय ७२ वर्षे, धंदा- शेती, रा. कानडीघाट, ता. जि. बीड ह. मु. विदया नगर (पश्चिम), बीड ता. जि. बीड

२. निलावती भ्र. पोपट माटकर, वय ६७ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कानडीघाट, ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे **नरसु बाबु झोडगे,** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १०/०२/२०२५ ही आहे.**

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

शिक्का

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

**नमुना- इ- ४**
**( नियम १८ पहा )**

**निवडणूक निर्णय अधिकारी:- श्री. व्ही. एस. जगदाळे**
**सहकारी संस्थेचे नाव:- राजर्षी शाहू तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड**

पदनाम:- **सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता. माजलगाव, जि. बीड**
अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक- १४/०६/२०२४

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ च्या नियम१८ प्रमाणे अधिकाराचा वापर करून आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या निवडीकरीता मी **व्ही. एस. जगदाळे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. केज, जि.बीड** आणि मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी बीड व मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने राजर्षी शाहु तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्याच्या निवडणूकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करून दि. ०६/०१/२०२५ पासून जाहीर करीत आहोत आणि या सोबत जोडलेल्या अनुसूचिच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघाच्या संबंधातील निवडणूक नियत करीत आहोत.

**अनुसूची**

| अ. क्र. | मतदार संघाचे नाव | | निवडणुक कार्यक्रम जाहिर करण्याचा दिनांक व वेळ | नामनिर्देशन पत्रे दाखल करण्यासाठी शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | मिळालेल्या नाम-निर्देशन पत्राच्या यादीच्या प्रसिद्धीचा दिनांक | नामनिर्देशन पत्राच्या छाननीचा दिनांक व वेळ | छाननीनंतरच वैद्य नामनिर्देशन पत्राच्या यादीचा प्रसिद्धीचा दिनांक | ज्या दिनाकांपर्यत उमेदवारी मागे घेता येईल तो दिनांक व वेळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या अंतिम यादीची प्रसिद्धी व चिन्हाचे वाटप दिनांक व वेळ | आवश्यक असल्यास ज्या दिनांकास ज्या वेळी व ज्या ठिकाणी मतदार घेण्यात येईल ती दिनांक ती वेळ व ते ठिकाण | मतमोजणी दिनांक वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल जाहीर करण्याचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | संस्थेच्या क्रियाशील सभासदांतून निवडलेले (सर्वसाधारण गटातून) | ०७ | दि. ०६/०१/२०२५ सकाळी ११.०० वा | दि.०६/०१/२०२५ ते दि.१०/०१/२०२५ सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.०६/०१/२०२५ ते दि.१०/०१/२०२५ जसे अर्ज प्राप्त होतील त्या प्रमाणे रोज दुपारी ४.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१३/०१/२०२५ सकाळी ११.०० पासुन छाननी संपेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०१/२०२५ सकाळी ११.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.१४/०१/२०२५ ते दि.२८/०१/२५ सकाळी ११.०० वा. ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दि.२९/०१/२०२५ सकाळी ११.०० वाजता (निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात) | दिनांक ०९/०२/२०२५ वेळ सकाळी ०८.०० ते दुपारी ०४.०० पर्यंत स्थळ नंतर घोषीत केले जाईल | दिनांक ०९/०२/२०२५ मतदान संपल्यावर लगेच स्थळ नंतर घोषीत केले जाईल | दिनांक ०९/०२/२०२५ मतमोजणी संपल्यानंतर लगेच स्थळ नंतर घोषीत केले जाईल |
| २ | अनुसूचित जाती / जमाती सभासदांसाठी (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| ३ | महिलांसाठी (राखीव) | ०२ | | | | | | | | | | |
| ४ | इतर मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| ५ | भटक्या विमुक्त जाती / जमाती व विशेष मागास प्रवर्ग (राखीव) | ०१ | | | | | | | | | | |
| | एकूण | १२ | | | | | | | | | | |

वरील अनुसुचिमधील क्र.०३ ते ०८ मधील कामकाज निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये होईल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचा पत्ता कार्यालय, सहायक निबंधक, सहकारी संस्था. ता. केज, जि. बीड, कृषि उत्पन्न बाजार समितीच्या जवळ, कळंब रोड, केज, ता. केज, जि. बीड असा आहे. निवडणूकी संबंधीत सर्व परीपत्रके, नियम व अनुषंगीक सुचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

**स्वाक्षरीत/-**
**(व्ही. एस. जगदाळे)**
**निवडणुक निर्णय अधिकारी**
**राजर्षी शाहू तालुका ग्रामिण नागरी सहकारी पतसंस्था म. केज, ता. केज, जि. बीड**

**स्वाक्षरीत/-**
**(समृत जाधव)**
**जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी**
**तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड**

**स्वाक्षरीत/-**
**(अशोक गाडे)**
**सचिव**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे**

# बाळासाहेबांच्या शिकवणीनुसार आम्ही रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानतो : संपर्कप्रमुख मोरे

## बीड शहरातील नागरिकांचे आरोग्य आधी महत्त्वाचे : सचिन मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू ठेवून बीड जिल्हा शिवसेना कार्य करत असलेल्या कामामुळे समाजातील गरजु, वंचित घटकातील नागरिकांना विविध प्रकारची मदत मिळते. आजच्या शिबिराच्या माध्यमातून अनेकांना लाभ मिळाला असून बाळासाहेबांच्या शिकवणीनुसार आम्ही रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानतो असे प्रतिपादन शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख बापूसाहेब मोरे यांनी केले. तर शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी आम्हाला समाजकारणाचे धडे दिले. त्यामुळेच आम्ही गरजूंसाठी आरोग्य शिबीरांचे आयोजन करुन डॉक्टर तसेच गरीब रुग्णांच्या मधील दुआ बनण्याचा प्रयत्न करीत असतो असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केले. दरम्यान शिबिरात पहिल्या दिवशी सहाशे रुग्णांनी लाभ घेतला. मुंबईचे डॉक्टर चव्हाण यांनी रुग्णांची तपासणी केली. वंदनीय हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण या धोरणानुसार लोककल्याण आरोग्य केंद्र मुंबई व जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेच्या वतीने ५ जानेवारी ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत बीड शहरातील विविध भागात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य नगर गणपत नगर येथे आरोग्य तपासणी शिबिराचे उदघाटन ५ जानेवारी रोजी जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

### विविध भागात सोळा दिवस शिबिर

**वंदनीय हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेच्या वतीने आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया व मोफत औषधींचे होणार वाटप होणार आहे. ५ जानेवारी ते २० जानेवारी या कालावधीत सोळा दिवस बीड शहरातील विविध भागात शिवसेनेच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन शिवसेन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले आहे.**



कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर आदी उपस्थित होते. कार्यक्रमास महिला जिल्हाप्रमुख चंद्रकला ताई बांगर, युवासेना लोकसभा प्रमुख सागर बहिर ,जिल्हा संघटक योगेश नवले ,सुनील सुरवसे, उपजिल्हाप्रमुख संतोष जाधव, अजय जाधव, क्र. उ.बा. समिती उपाध्यक्ष श्याम भाऊ पडोळे, उपस्थित होते.



*परभणी प्रकरणात शहीद सोमनाथ सुर्यवंशी यांच्या कुटुंबीयांनी आज यशवंत भवन, अकोला येथे नेते बाळासाहेब आंबेडकर यांची भेट घेतली. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या तपास प्रकरणात पोलिसांकडून योग्य तपास होत नसल्याची तक्रार सूर्यवंशी कुटुंबियांनी केली. यावेळी बाळासाहेब आंबेडकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी फोनवर संपर्क साधून केसच्या तपासाची माहिती घेतली आणि अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई विजयाबाई व्यंकट सुर्यवंशी, भाऊ प्रेमनाथ सुर्यवंशी, मावशी तेजश्री दिगंबर विटकर, मावसा दिगंबर यलप्पा विटकर आदी उपस्थित होते.*

# बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांच्या बैलांच्या अपघातांची मालिका: ऊसतोड कामगार मेहनतीवर मोठा आघात

**किल्लेधारुर । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील आठवड्यात बैलांच्या अपघाताच्या दोन गंभीर घटना घडल्या आहेत. कळूचीवाडी येथील श्रीराम बिक्कड यांच्या बैलाचे कर्नाटकातील अतानी सुगर लिमिटेड येथे अपघाती निधन झाले, तर जायभायवाडी येथील राधाकिशन राजाराम कराड यांची गाडी उसाच्या फडात चिखलात फसली असताना ती बाहेर काढताना अपघात झाला. यात यांच्या



बैलास जबर मार लागल्यामुळे दोन शिंगे व पाय निकामी झाले. बैल अपंग झाला आहे.

या दुर्दैवी घटनांनी ऊसतोड मजुरांच्या मेहनतीवर मोठा आघात केला आहे. ऊसतोड मजुरांनी आपल्या बैलांसाठी विमा उतरवणे किती आवश्यक आहे, हे या घटनांमधून अधोरेखित झाले आहे. अशा घटना टाळण्यासाठी योग्य खबरदारी घेण्याची गरज आहे.

युवा ग्राम विकास मंडळ संस्थे अंतर्गत नेहमी ऊसतोड मजुरांना ऊसतोडनी करायला जाण्याअगोदर आपला कुटुंबाचा व पशूंचां विमा उतरण्यासाठी आवाहन करून महत्त्व सांगितले जाते. अशा घटना घडल्यास ऊसतोड मजुरांनी आपल्या बैलाचा रीतसर पंचनामा करून घ्यावा व आवश्यक त्या कागदपत्रांसह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत शासन निर्णय १० ऑक्टोंबर २०२४ गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत अर्ज करावा. या अंतर्गत ऊसतोड मजुरास आपल्या झालेल्या नुकसानीची काही प्रमाणात भरपाई मिळू शकते. अशी माहिती युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे प्रशासनिक संतोष रेपे यांनी दिली.

# सामाजिक सलोखा व कष्टकऱ्यांच्या लढाईसाठी लाल झेंडा तेवत ठेवू : कॉ.अजित नवले

**माकपचे जिल्हा अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न ; बीड जिल्हा सचिव पदी कॉ.एड. अजय बुरांडे यांची फेरनिवड**

**बीड । प्रतिनिधी**

भांडवलदारी दलदलीत कमळ खुलवण्यासाठी सर्वत्र जाती आणि धार्मिक द्वेषाचा चिखल उडवून अस्मितेच्या राजकारणातून शोषणाचा पाया पक्का केला जात असताना सर्वसामान्य सर्वहारा जनतेचे मूलभूत प्रश्न राजकीय पटावर सातत्याने तेवत ठेवत समाजात विर्जन घालणाऱ्या जातीवादी व धर्मांध ताकतीचे प्रस्त वाढत आहे. ते थोपवणे व पक्ष सभासदांनी जनमानसाला हतबलता न येऊ देण्यासाठी आपापसात प्रेमभाव वाढवून सर्व कल्याणाचा विचार पेरून लाल झेंडा तळपत ठेऊ असा विश्वास मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य कॉ.डॉ.अजित नवले यांनी व्यक्त केला.

क्रांतिकारी पक्ष म्हणून ओळख असलेल्या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्ह्यात मोठा इतिहास असून स्वातंत्र्यलढ्याच्या चळवळीसह देशातील शेतकऱ्यांना पहिली कर्जमुक्ती मिळवून देणारे बीड जिल्ह्याचे माजी खासदार क्रांतीसिंह नाना पाटील, आपली सबंध हयात सर्वहरा वर्गाच्या उत्कर्षासाठी घालवणारे माजी खासदार कॉ. गंगाधरअप्पा बुरांडे असं संघर्षमय वैचारिक वारसा असलेला माकप चे २४ वे बीड जिल्हा अधिवेशन मोहा या ठिकाणी उत्साहात संपन्न झाले.

यावेळी जिल्हाभरातून आलेल्या पक्ष सभाससदांनी मागील तीन वर्षात आपण केलेल्या कृतीचा टीका, आत्मटिकात्मक आढावा घेऊन पुढील संघर्षाची दिशा निश्चित करण्यासाठी विचार मंथन केले. सोबतच पुढील तीन वर्षासाठी पक्षाची धुरा सांभाळण्यासाठी बीड जिल्ह्यासह राज्यात शेतकरी आंदोलनाचा आवाज बनलेले मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉ.एड.अजय बुरांडे यांची पुढील तीन वर्षासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सचिव म्हणून सर्वानुमते एकमुखी फेर निवड यावेळी करण्यात आली.

# सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना शिक्षणरूपी कवच कुंडले प्रदान केली : रोहिदास डोंगरदिवे

**डॉ. भीमराव पिंगळे विद्यालयामध्ये सावित्रीबाई फुले जयंती साजरी**

**बीड । प्रतिनिधी**

स्त्रियांना खऱ्या अर्थाने सक्षम बनवण्यासाठी शिक्षणरूपी बळकट व कार्यक्षम कवचकुंडले प्रदान करणे गरजेचे आहे ही काळाची गरज ओळखून अंधकारमय जीवनाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाचा अखंड दीप प्रदान करून त्यांना काळाची आव्हाने पेलवण्यास सक्षम बनवले असे प्रतिपादन डॉ. भीमराव पिंगळे विद्यालयाचे नवनियुक्त मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे यांनी केले. शाळेमध्ये शुक्रवारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या जयंती कार्यक्रमानिमित्त अनेक विद्यार्थी- विद्यार्थिनींनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कार्याबद्दल त्यांचा गौरव करणारी प्रभावी भाषणे केली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष पद मुख्याध्यापक रोहिदास डोंगरदिवे यांनी भूषवले व आपल्या अध्यक्षीय समारोपात डोंगरदिवे म्हणाले की,सावित्रीबाई फुले यांनी समाजाच्या प्रगतीची स्वप्न पाहत, त्या स्वप्नांना खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात उतरवण्यासाठी स्त्री शिकली पाहिजे हा कळीचा मुद्दा लक्षात घेऊन स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि आपले पती ज्योतिबा फुले यांच्या सहकार्याने स्त्री शिक्षणाला



आरंभ करत स्त्रियांच्या जीवनात शैक्षणिक क्रांती घडवून आणली. त्यांच्या त्या नंदादीपाप्रमाणे केलेल्या कार्यामुळेच आजची आधुनिक स्त्री शिक्षणाच्या कवचकुंडलामुळे खंबीर आणि सक्षम बनली.

## तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

नवगण शिक्षण संस्था संचलित तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाट या शाळेची यावर्षीची सहल कोकण तसेच महाबळेश्वर प्रति बालाजी या परिसरामध्ये गेली चार दिवस मुक्काम व सहल एकूण सहा दिवसाची होती. सहल दिनांक ३१ डिसेंबरला सुरुवात होऊन ४ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली शाळेचे मुख्याध्यापक श्याम डाके सर यांच्या नेतृत्वाने व मार्गदर्शनाने सहलीचे आयोजन करण्यात आले या सहलीचे सहल प्रमुख सहशिक्षक श्री शिवाजी पवार सर यांनी जबाबदारी पाहिली. या सहलीसाठी अथक परिश्रम घेणारे विद्यार्थी प्रिय शिक्षक श्री श्रीहरी लहाने सर श्री कल्याणजी वामने सर श्री गणेश जी काशीद सर सेवक श्री काटवटे नाना व राजेभाऊ काळे इत्यादींची खूप खूप सहकार्य लाभले. सहल सुरुवातीला पंढरपूर विठ्ठलाचे दर्शन घेऊन दत्ताच्या दर्शनासाठी नृसिंहवाडी येथे गेली असता त्या ठिकाणी सकाळचा नाश्ता स्नान होऊन कोल्हापूर परिसर पाहण्याचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला या मध्ये कनेरी मठ देवीचे दर्शन न्यू पॅलेस रंकाळा धरण पन्हाळगड ज्योतिबा दर्शन व ज्योतिबा मध्ये मुक्काम केला त्यानंतर दुसऱ्या दिवशी श्री नरेंद्र स्वामी यांचे नानिज्धाम मठ पाहून गणपतीपुळे येथे सागराच्या पाण्याचा आनंद घेतला.

# बुथप्रमुखांनी घरोघरी जाऊन जास्तीत जास्त भाजपा सदस्य नोदंणी करुन घ्यावी: मा.आ.लक्ष्मण पवार

**शहरासह सर्कल मधील बुथवर २०० भाजपा सदस्यांची नोदंणी करण्याचे उद्दिष्ट**

**गेवराई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रात भाजपा सदस्य आभियाण सुरु आहे तरी मतदारसंघातील प्रत्येक बुथवर जाऊन जास्तीत जास्त सदस्य नोदंणी नोदणी करण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन मा.आ. लक्ष्मण पवार यांनी केले आहे



आज गेवराई येथील मा.आ. लक्ष्मण पवार यांच्या कोल्हेररोड वरील भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे भारतीय जनता पार्टी २२८-गेवराई विधानसभा जिल्हा बीड.भाजपा सदस्य अभियानास सुरुवात झाली यावेळी विधानसभा निवडणूक प्रमुख मा.शाम आबा कुंड नगराध्यक्ष सुशील भाऊ जंजाळ, उपनगराध्यक्ष राजेंद्र दादा राक्षभुवनकर ,भगवान घुबार्डे ,राहुल खंडागळे,याहीया खॉन, दादासाहेब गिरी, अनिल पौळ, भरत गायकवाड,अँड.सुरेश पवार, संजय इगळे, समाधान मस्के, अमोल मस्के,राम पवार, रामप्रसाद आहेर,लक्ष्मण चव्हाण,धनवडे मामा, चेअरमन गंगाधर, श्रिराम घाटुळ,मतिन कुरेशी, बबन राठोड, बाबा खरात, आदी उपस्थित होते.

## भगवान महाविद्यालयात लेखक -विद्यार्थी वाचन संवाद

**आष्टी । प्रतिनिधी**

महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या कार्यक्रमा अंर्तगत लेखक व विद्यार्थी वाचन संवाद या कार्यक्रमाचे शुक्रवार दिनांक ३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता महाविद्यालयाचे सेमिनार हॉलमध्ये येथील भगवान महाविद्यालयात आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ प्रमुख पाहुणे डॉ. ज्ञानेश्वर वैद्य तर लेखक व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अप्पासाहेब टाळके हे होते. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी अगदी भरभरून प्रतिसाद दिला. लेखक उपप्राचार्य डॉ. टाळके यांनीही त्यांच्या सर्व प्रश्नांचे समाधान केले. पुस्तक वाचनाचे महत्त्व, ते कसे वाचावे? कोणती पुस्तके वाचावीत ? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.दत्तात्रय वाघ यावेळी म्हणाले विद्यार्थ्यांनी मोबाईलपासुन दूर रहावे. मोबाईलपासुन दूर राहिल्यास वाचनाची



आवड निश्चित मनात निर्माण होईल. त्यासाठी पालकाची भूमिकाही महत्त्वाची आहे. त्यांनाही कठोर निर्णय घेऊन मुलांचे लाड कमी करावे लागतील. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री नंदकिशोर धोंडे, श्री काकासाहेब सोले आणि ग्रंथालय सहाय्यक श्री पांडुरंग साबळे यानी परिश्रम घेतले.

## सौरभ जाधव एका शेतकऱ्याचा मुलगा चार्टर्ड अकाउंटंट बनून देशभरात आदर्श ठरला



**आष्टी । प्रतिनिधी**

सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या सौरभ सतीश जाधव यांनी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षेत यश संपादन करून आष्टी व पंचक्रोशीचा लौकिक वाढवला आहे. पुण्यातील सर परशुराम महाविद्यालयात शिक्षण घेतलेल्या सौरभने आपल्या जिद्द, मेहनत, आणि चिकाटीच्या जोरावर हे कठीण आव्हान पेलले आहे.

सौरभ जाधव यांनी जगातील कठीण मानल्या जाणाऱ्या सीए परीक्षेत दोन्ही ग्रुप यशस्वीरीत्या पास केले. अत्यंत साध्या परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या सौरभने आपल्या मेहनतीने आणि कष्टाने कुटुंबाचे तसेच गावाचे नाव मोठे केले आहे. त्यांच्या यशामुळे पंचक्रोशीतील तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सौरभच्या सन्मानार्थ आष्टीत आयोजित सत्कार सोहळ्यात सौरभ चे वडील सतिश जाधव, समाजसेवक अशोक अण्णा पोकळे, सिध्दीविनायक उद्योग समूहाचे मालक रमेश भोगाडे, डॉ. सखाराम वाढरे, डॉ. रवी सातभाई, सिताराम हंबर्डे, योगेश बोराडे आकाश भोगाडे उद्धव भोगाडे आणि सुशिल हंबर्डे यांनी त्याचा सन्मान केला.

